महा मेट्रो
NAGPUR METRO

# महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड
# (नागपूर मेट्रो रेल प्रकल्प)

---

## एअरपोर्ट साऊथ मेट्रो स्टेशन येथे 3D-20 लोगो स्थापित

## 130 फूट रुंद 20 फूट उंच स्ट्रक्चर नागपूरची शान



नागपूर: शहरातील विविध संस्थांकडून G-20 परिषदेची तयारी सुरू असून एअरपोर्ट साऊथ मेट्रो स्टेशन येथे जी - २० थीमवर एक मोठा 3D लोगो बसविण्यात आला आहे. थ्री डायमेन्शनल लोगो आणि इतर क्रिएटिव्ह मॉडेल हे देशातील एकमेव असे अद्वितीय मॉडेल आहे. जी - २० परिषदेची तयारी जोरदार सुरू असून शहराच्या सुशोभिकरणाच्या दिशेने महा मेट्रोकडून विविध कामे केली जात आहेत.

महा मेट्रोने बनवलेल्या लोगो मध्ये टायगर मॅस्कॉट G-20 आणि महा मेट्रो नागपूर लोगोचा समावेश आहे, 130 फूट रुंद आणि 20 फूट उंच, अश्या सुमारे 1000 किलो वजनाचे आहे.संपूर्ण साहित्य फायबर रीइन्सफोर्ट प्लास्टिक (FRP) चे बनविण्यात आले आहे. हा केवळ 3D लोगो नाही तर संपूर्ण रचना एका सुंदर G-20 थीम पार्कचा भाग आहे. याशिवाय नागपूर मेट्रोने नागरिकांसाठी थीम पार्कचीही योजना आखली आहे यामुळे थ्रीडी पार्क आणखी आकर्षक होईल.

थीम पार्क 30,000 स्क्वेअर फूट परिसरात तयार केल्या, जे की कायमस्वरूपी असेल विविध सजावटीच्या वस्तू आणि फुलांच्या रोपांनी हे उद्यान सजवले जाईल. या थीम पार्कमध्ये अभ्यागतांसाठी बसण्याची आणि बसण्याची व्यवस्था तसेच स्केटिंग आणि लहान मुलांच्या मनोरंजनाची व्यवस्था असेल.